कुल प्रश्नों की संख्या : 25 | कुल पृष्ठों की संख्या : 08

Total No. of Questions: 25 | Total No. of Pages: 08

# हाई स्कूल परीक्षा, दिसम्बर – 2017

# 204

## विषय : मराठी

## Subject: MARATHI

समय : 03 घण्टे | पूर्णांक : 100

Time: 03 Hours | Maximum Marks: 100

*निर्देश–*

*(1) प्रश्न क्र. 1 ते प्रश्न क्र. 5 वस्तुनिष्ठ प्रश्न आहेत.*

*(2) प्रश्न क्र. 6 ते प्रश्न क्र 25 प्रत्येक प्रश्न विकल्प दिले आहेत.*

*(3) प्रत्येक प्रश्नासमोर निर्धारित अंक दिले गेले आहेत.*

*(4) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.*

प्र.1 योग्य पर्याय निवडा. (5)

1. (i) लेखकानुसार छंद कशाला म्हणतात.

(ii) दुर्मिळ वस्तु जमविणे.

(iii) जे करताना आपण भान हरपून जातो तो.

(iv) जे कख्ण्यात खराखुरा, निरपेक्ष, निर्मोळ आनंद होतो तो

2. टस्कगीतील विद्यार्थ्यांना अभ्यास कमातील पुढील विषय नावडता वाटत होता.

(i) व्यवसाय

(ii) शेती

(iii) कारागिरी



mpcareer.in

3. शेतात गर्दी झली आहे, कारण

(i) शेतात खूप माणसे काम करत आहेत.

(ii) शेतात खूप तण वाढले आहे.

(iii) पिकाला बहर आला आहे.

4. मालकीण बाईच्या मागोमाग जाताना सिरपाचा जीव

(i) आनंदून गेला होता.

(ii) अनामिक भीतीने आणि अचंब्याने ग्रासला होता.

(iii) वरखाली होत होता

5. गावकोसाचे देऊळ–

(i) उदास आहे

(ii) उद्ध्वस्त आहे

(iii) भग्न आहे

प्र.2 योग्य जोडया जुळवा **(5)**

| (अ) | (ब) |
|---|---|
| (1) मानवता | (i) साने गुरूजी |
| (2) कणा | (ii) कुसुमाग्रज |
| (3) सुधास पत्र | (iii) चि.वि. जोशी |
| (4) आम्ही कोण | (iv) अनिल |
| (5) स्पष्ट वक्तेपणाचे प्रयोग | (v) केशवसुत |



mpcareer.in

प्र.3 सत्य/असत्य ते लिहा. **(5)**

(1) विठ्ठल हाच आपला मायबाप आहे असे संत ज्ञानेश्वरानां वाटते.

(2) साधुसज्जनांची तुलना तुकारामांनी नातेवाईकाशी केली आहे.

(3) वृंदावन तुटल्यामुके तुळस पोरकी झाली होती.

(4) यत्रांचे कर्तव्य पाहिले की मनुष्याचे मन थक्क होते.

(5) हमालांकडे पाहण्याची समाजाची दृष्टी उदासीनतेची आहे.

प्र.4 एका वाक्यात/शब्दात उत्तरे लिहा. **(5)**

(1) चिमण्यांचे जोडपे लेखकाच्या खोलीत कशासाणि आले होते?

(2) कोणत्या सणाला बैलाची पूजा करतात?

(3) आज्ञा + अनुसार शब्द जोडून एक शब्द तयार करा

(4) परत येऊन तो काम सुरू करील. (सर्वनाम ओळखा)

(5) धीट या शब्दाची भाववाचक नामे लिहा.

प्र.5 खालील वाक्प्रचाराचा अर्थ लिहा. **(5)**

(1) अटकाव नसणे

(2) तोंडचे पाणी पळणे

(3) बाऊ करणे

(4) जतन करणे

(5) पाठ थोपटणे

प्र.6 कवी संतापून का उठतो? **(2)**

**किवां**

कवीला भेटायला आलेला मनुष्य हा कोण होता?



mpcareer.in

प्र.7 शेतात भरघोस पीक आल्याचे श्रेय शेतकरी कोणाला देतो? (2)

किवां

संत जनाबाईने विठ्ठलाशी कोणते नाते जोडले आहे?

प्र.8 लेखकाची आई घर सोडून का गेली? (2)

किवां

अकबराने मेव्हण्याला कोणता प्रश्न केला?

प्र.9 'आम्ही त्यांना खात नाही, – त्यांनी आम्हांला का भ्यावे?' हे उद्‌गार कोणाचे? कोणाला उद्देशून? (2)

किवां

कापसाच्या पिकाचे नुकसान कोणी केले?

प्र.10 विशेषण ओळखा – (2)

(1) अभिषेक चार वर्षाचा असतांना शाळेत गेला.

(2) भुजंगाचे अंग केसाळ असते.

किवां

पुढील वाक्याचे काळ ओळखा

(1) जनाबाई विठ्ठल भक्तीत लीन झाल्या होत्या.

(2) सुनंहा उद्‌या आपल्या आजीकडे जाईल.

प्र.11 खालील वाक्य समुहाबद्दल एक शब्द लिहा. (कोणतेही दोन)। (2)

(1) ज्याला नाव देता येत नाही.

(2) दर वर्षाने प्रसिद्ध होणारे.

(3) केलेल्या उपकाराची जाणीव असलेला.

(4) ज्याला अंत (शेवट) नाही असा.



mpcareer.in

प्र.12 शुद्ध शब्द ओळखून लिहा. (2)

(1) दरशन, दर्शन, द्रशन

(2) पुर्वग्रह, पूर्वर्गह, पूर्वग्रह

किवां

(1) आशाळभुत, आशाळभूत, आशाभुत

(2) उपलबध्, उपलध्ब, उपलब्ध

प्र.13 कसांतील सुचनेप्रमाणे बदल करा (कोणतेही दोन) (2)

(1) लोकांनी पेरणी धरली (भविष्य काळ करा)

(2) पाखरे वाठेत थांबतात, काणोसा घेतात (वाक्य शुद्ध करून लिहा)

(3) राम दूध पितो (नामे ओळखा)

(4) आकाश (या शब्दाला दोन समानार्थी शब्द लिहा)

प्र.14 'अभाग्याचे अश्रू' या शब्दांतून कवीला काय सुचवायचे आहे? (4)

किवां

सर देऊ करत असलेली आर्थिक मदत त्याने का नाकारली?

प्र.15 आपल्या पुण्यकर्माचे कोणते फळ त्यानां मिळाले? असे ज्ञानेश्वर म्हणतात? (4)

किवां

कवींनी देवाच्या वसाहती कोठे वसविल्या?

प्र.16 हमालांना आपले हक्क मिळवण्यासाठी किती वर्षे लढा दयावा लागला? 'हमाल पंचायत' ची कधी स्थापना झाली? (4)

किवां

लेखकाला जेट – युग का नवे वाटले नाही?



mpcareer.in

प्र.17 छदांची कोणती व्याख्या लेखकाला सुचवायची आहे? **(4)**

**किवां**

डॉ. कार्व्हर यांना कोणते आव्हान स्वीकारायचे आहे?

प्र.18 सिरपा परत का फिरला? **(4)**

**किवां**

पोळयाचा सण साजरा करण्यामागे शेतकऱ्याची कोणती भावना असते?

प्र.19 पुढील शब्दाचे समानार्थी शब्द लिहा – **(4)**

(1) जमीन

(2) किमया

(3) जननी

(4) राजा

**किवां**

पुढील शब्दाचे विरूद्धार्थी शब्द लिहा :

(1) पवित्र

(2) जन्म

(3) आत

(4) शिक्षित

प्र.20 'साजावताना' कवितेतील 'स्वप्नाची झुबरे' ही कल्पना स्पष्ट करा. **(5)**

**किवां**

तेरणेच्या आसवांचा रंग लाल होता असे कवी कां म्हणतो.

mpcareer.in

प्र.21 पुढील वाक्याचे संदभीसहित स्पष्टीकरण करा. (5)

'प्रसाद म्हणून पापण्यामंध्ये पाणी थोडे ठेवले'.

**किवां**

''फोले पाखडिता तुम्ही, निवडतो ते सत्व आम्ही निके''

प्र.22 पुढील वाक्याचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा. (5)

स्वातंत्र्य हा पक्षांचा प्राण आहे.

**किवां**

सिरपाची हाक दगडानां धक्के देत गेली.

प्र.23 शाळेच्या विद्‌यार्थि भाडांराकरता स्टेशनरी सामानाची मागणी करणारे पत्र स्टेशनरी मालाच्या दुकानदारास लिहा. (5)

**किवां**

दिवाळीच्या सुट्‌टीत तुमच्या गावी बोलवण्यासाठी मित्राला पत्र लिहा.

प्र.24 खालील उतारा वाचून त्याच्यांखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (5)

अहिंसा हे एक फार मोठे मूल्य आहे– नाइलाज झाल्याशिवाय हिंसा करूच नये, अशी भारतीय संस्कृतीची शिकवण आहे– पण हिंसा म्हणजे तरी काय? प्राण घेणे, जिवानिशी मारणे किवां दुसऱ्याला शारीरिक इजा करणे एवढीच हिंसेची व्याप्ती नाही. दुसऱ्याचे मन दुखावणे, टोचून बोलणे, अपमान करणे, हिणवणे, आनंद हिरावून घेणे ही सारी हिंसेचीच रूपे आहेत. भारतात महात्मा गांधीनी अहिंसेचा मोठा प्रयोग केला. बलाढय ब्रिटिश सत्तेला अहिंसेने जेरीला आणले. इतकी वर्षे तुरूंगांत डांबून ठेवलेले नेल्सन मंडेला विजयी झाले. दक्षिण अफ्रिकेतील कृष्णवर्णीयानां आता न्याय मिळू



mpcareer.in

लागला आहे. ब्रिटिश माणसाबद्दल द्वेष किंवा तिरस्कार न वाटता, त्यांच्या राजटी विरूद्ध लढा दयायला गांधीजींनी शिकवले.

प्रश्न :

(1) हिंसेची कोणकोणती रूपे उताऱ्यात सांगितली आहेत?

(2) गांधीजींनी ब्रिटिश सत्तेला कशाच्या जोरावर नमवले?

(3) नेल्सन मंडेला यांनी कोणाला न्याय मिळवून दिला?

(4) गांधीजींनी काय शिकवले?

(5) या उताऱ्याला योग्य शीर्षक दया.

प्र.25 खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा (150 – 200 शब्द) **(10)**

(i) हुंडा –एक सामाजिक समस्या

(ii) विज्ञान–शाप की वरदान?

(iii) मानव धर्म – महान धर्म

(iv) माझा आवडता छंद

(v) माझा आवडता महिना– श्रावण

..................................................



mpcareer.in